रविवार दि. ०५ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# समृद्धी महामार्ग प्रकरणाला मोठे वळण;

## APCO Infratech Pvt. Ltd. विरुद्ध परतूर पोलिसांत गुन्हा दाखल

## आ. लोणीकर यांच्या पाठपुराव्याला गती



**मुंबई - प्रतिनिधी**

जालनानांदेड समृद्धी महामार्गाच्या बांधकामादरम्यान कथित अवैध मुरूम उत्खनन, निकृष्ट दर्जाच्या भराव साहित्याचा वापर, तांत्रिक नियमांचे उल्लंघन आणि शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याच्या आरोपांमुळे राज्यभर चर्चेत आलेल्या प्रकरणाला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी हा विषय महाराष्ट्र विधानसभेत उपस्थित करून स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणाची दखल घेत आपल्या दालनात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावली असून, दरम्यान लघु पाटबंधारे विभागाच्या फिर्यादीवरून . . आणि संबंधित व्यक्तींविरुद्ध परतूर पोलीस ठाण्यात सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात लघु पाटबंधारे विभागाचे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक योगेश राजू वैद्य यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एफआयआर क्रमांक ०३२४/२०२६ नोंदविण्यात आला असून, पुढील तपास परतूर पोलीस करीत आहेत. या गुन्ह्याची नोंद झाल्याने समृद्धी महामार्गाच्या कामातील कथित अनियमिततेबाबत प्रशासनाची भूमिका अधिक गंभीर झाल्याचे मानले जात आहे.

**तलावाच्या संरक्षणभिंतीलगत खोल उत्खनन; गंभीर धोक्याची नोंद**

फिर्यादीनुसार, मंठा तालुक्यातील नागथास बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प परिसरातून मुरूम उत्खननासाठी मर्यादित प्रमाणात परवानगी देण्यात आली होती. मात्र मंजूर रॉयल्टीचे प्रमाण संपल्यानंतरही तलावाच्या संरक्षणभिंतीलगत अंदाजे १५ ते २० फूट खोल खड्डे खोदून मोठ्या प्रमाणात मुरूम काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या उत्खननामुळे तलावाच्या संरक्षक भिंतीची स्थिरता धोक्यात आली असून, भविष्यात अतिवृष्टी किंवा पाण्याचा ताण वाढल्यास तलाव फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अशी घटना घडल्यास शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान होण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी आणि जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशीही भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**समृद्धी महामार्गाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह**

आमदार बबनराव लोणीकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात समृद्धी महामार्गाच्या भरावामध्ये मंजूर दर्जाच्या साहित्याऐवजी काळ्या मातीचा वापर करण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. या मातीमध्ये दगड-गोटे मिसळून शेतातील बांधाप्रमाणे भराव टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

नियमानुसार प्रत्येक दोन ते तीन फुटांच्या थरानंतर रोलरद्वारे दाबणी, घनता चाचणी ( ), प्रयोगशाळेतील गुणवत्ता तपासणी आणि अभियंत्यांकडून प्रत्यक्ष पाहणी करणे बंधनकारक असताना या प्रक्रियेचे पालन करण्यात आले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. यामुळे भविष्यात रस्ता खचणे, भेगा पडणे, वाहतुकीस धोका निर्माण होणे आणि गंभीर अपघात घडण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**एमएसआरडीसी अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्न**

लोणीकर यांनी आपल्या निवेदनात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ () च्या अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्या कामकाजावरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

मुरूम उत्खननावर देखरेख ठेवणे, वाहनांची तपासणी, जीपीएस पडताळणी, प्रयोगशाळेतील चाचण्या, गुणवत्ता नियंत्रण आणि साइट निरीक्षण या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे पार पाडल्या नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वेळेत कारवाई झाली असती तर कथित अवैध उत्खनन रोखता आले असते, असा दावा करत संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान त्यांच्या मालमत्तेतून वसूल करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**मोजणीत अतिरिक्त उत्खननाचे दावे**

उपलब्ध नोंदींचा आधार घेत आमदार लोणीकर यांनी मंठा *(पान २ वर )*

## मुक्ताईनगरहून आलेल्या दिंडीचे आ.अर्जुनराव खोतकर व संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर यांच्याकडून स्वागत

**जालना –प्रतिनिधी**

मुक्ताईनगर येथून विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या दिंडीचे जालना जिल्ह्यात आगमन होताच जालना विधानसभेचे आमदार अर्जुनराव खोतकर आणि शिवसेना संपर्कप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर यांनी पालखीचे दर्शन घेत वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी दिंडी प्रमुख ह.भ.प. रवींद्र महाराज हरणे यांचा पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, मनसे जिल्हाध्यक्ष गजानन गीते



यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दिंडीचा जालना जिल्ह्यातील मुक्काम आणि प्रवास सुरळीत पार पडावा, यासाठी सर्व मुक्कामस्थळी सुव्यवस्था राखण्याच्या सूचना व आवश्यक निर्देश आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रशासनाला दिले. दिंडीतील सर्व वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था ज्ञानेश्वर खरात यांच्या वतीने करण्यात आली होती. तसेच रविवारी सकाळी शहरातील जेईएस महाविद्यालयाच्या मैदानावर रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले.

## फुले दाम्पत्याला मरणोत्तर भारतरत्न द्या, माळी महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दत्ता देशमुख**

आधुनिक समाजक्रांतीचे अग्रदूत क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या उभयतांना संयुक्त मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी बुधवारी मुंबईतील वर्षा निवासस्थानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनाद्वारे ही मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला.

अविनाश ठाकरे हे माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष असून ते महाराष्ट्र राज्य ओबीसी महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) आणि केंद्र सरकारच्या महात्मा जोतीराव फुले द्विशताब्दी महोत्सव उच्चस्तरीय समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

शिक्षण, स्त्री-साक्षरता, अस्पृश्यता निवारण आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी फुले दाम्पत्याने केलेले ऐतिहासिक कार्य पाहता त्यांना मरणोत्तर भारतरत्न देऊन गौरविणे ही काळाची गरज आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



## जालना जिल्ह्यात प्रथमच होणाऱ्या श्री संत मुक्ताबाई पालखीच्या ऐतिहासिक रिंगण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाविकांना आवाहन

**जालना – प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायासाठी अत्यंत आनंदाची व ऐतिहासिक बाब म्हणजे श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर येथील पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला असून, हा वारकरी परंपरेतील एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय क्षण ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून व विविध शासकीय विभागांच्या समन्वयाने हा सोहळा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे.



श्री संत मुक्ताबाई यांची पालखी दि. ०४ जुलै २०२६ रोजी जालना जिल्ह्यात प्रवेश करीत असून श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कन्हैयानगर, जालना येथे पालखीचा मुक्काम राहणार आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी जिल्हा प्रशासनामार्फत भाविक वारकरी, दिंडी तसेच सेवेकऱ्यांसाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये वॉटरप्रूफ मंडप, अखंडित वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, डास प्रतिबंधक फवारणी, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, अग्निशमन सेवा, पशुवैद्यकीय सुविधा तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संत मुक्ताबाई पालखीच्या जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या ऐतिहासिक रिंगण सोहळ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, विविध विभागांतील एकूण ३२५+ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये २२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी, जालना शहर महानगरपालिकेची स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था व नागरी सुविधांसाठी नियुक्त २ विशेष पथके (एकूण ३८ अधिकारी/कर्मचारी), २ आरोग्य पथके (एकूण ३३ अधिकारी/कर्मचारी), ४ रुग्णवाहिका, २ अग्निशमन वाहने, महावितरणची २ तांत्रिक पथके, २ पशुवैद्यकीय पथके तसेच विविध विभागांची, आरोग्य सेवेस, अखंडित वीजपुरवठ्यास, स्वच्छतेस तसेच इतर सर्व नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण समन्वयाने कार्यरत राहणार आहेत.

त्यानंतर दि. ०५ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे संत मुक्ताबाई पालखीचा प्रथम ऐतिहासिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, कार्यक्रमस्थळी मंच व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, नियंत्रण कक्ष, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, अग्निशमन पथक, पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

रिंगण सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी, पालकमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आयुक्त, शहर महानगरपालिका, निवासी उपजिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल, पोलीस, आरोग्य, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, अग्निशमन, पशुसंवर्धन, जिल्हा परिषद, परिवहन तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

या ऐतिहासिक सोहळ्यास पालकमंत्री महोदय, जालना जिल्ह्यातील आमदार, विविध लोकप्रतिनिधी, मान्यवर तसेच वारकरी संप्रदायातील संत, महंत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व भाविकांच्या सुरक्षितता, सुविधा व सुयोग्य व्यवस्थापनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत. भाविकांनी प्रशासनाने केलेल्या वाहतूक नियोजन, पोलीस प्रशासनाच्या *(पान २ वर )*

## टेंभुर्णी बसस्थानकाला अतिक्रमणाचा फास, वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

### प्रवेशद्वारावरील हॉटेल आणि टपऱ्यांमुळे एसटी बसेसना वळायलाही मिळेना जागा

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी शहराचे मुख्य बसस्थानक सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले आहे. रस्त्याच्या दुतर्फा आणि बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर हॉटेल व्यावसायिक, टपरीधारक आणि दुकानदारांनी बस्तान मांडल्याने मुख्य रस्ता अतिक्रमणाखाली गेला आहे. या भयंकर वाहतूक कोंडीमुळे दररोज हजारो प्रवाशांचे हाल होत असून, या रस्त्याची जबाबदारी असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. बसस्थानकात दररोज शेकडो बसेस आणि हजारो प्रवाशांची वर्दळ असते. मात्र, हॉटेल व्यावसायिकांनी आपले बाकडे, गाडे आणि शेड थेट रस्त्यावर आणल्याने ग्राहकांची



वाहने रस्त्यावरच उभी केली जातात. यामुळे एसटी बसेसना आत वळण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी जागाच उरत नाही. बसस्थानक परिसरात सतत कोंडी होत असल्याने तासनतास ट्रॅफिक जाम होते. शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना

**पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे**

संबंधित गाळेधारकांना स्थानिक ग्रामपंचायतीकडून अतिक्रमणासंदर्भात नोटीस देणे आवश्यक आहे. महामार्गावर उभ्या राहणाऱ्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांमुळे रहदारीला अडचण निर्माण होत असून, स्थानिक पोलिसांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक गजानन देठे यांनी केली आहे. पायी चालण्यासाठी साधी फूटपाथची जागाही उरलेली नाही.

अतिक्रमण झालेली जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येते. मात्र, या विभागाचे अधिकारी पाहणी *(पान २ वर )*

# संपादकीय....

## चौकशी निष्पक्ष, कारवाई कायद्यानुसारच व्हावी

परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून कथितपणे पाकिस्तानी गाण्यावर कार्यक्रम सादर झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि काही तासांतच हा विषय स्थानिक वादातून राज्यव्यापी चर्चेचा बनला. त्यानंतर पोलिसांत गुन्हा दाखल झाला, राजकीय नेत्यांच्या भेटी सुरू झाल्या आणि आता शाळेच्या मान्यता, जागेची वैधता व प्रशासकीय परवानग्यांपर्यंत हा मुद्दा पोहोचला आहे.

या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ भावनिक किंवा राजकीय दृष्टिकोनातून न पाहता, तीन मूलभूत प्रश्नांच्या आधारे पाहण्याची गरज आहे. पहिला प्रश्न म्हणजे शैक्षणिक संस्थांची जबाबदारी. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्ये, संविधानिक भावना आणि सामाजिक जबाबदारी रुजविण्याचे केंद्र असते. सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करताना गाणी, सादरीकरणे आणि त्यांचा सामाजिक परिणाम याबाबत अधिक संवेदनशीलता अपेक्षित असते. जर दुर्लक्ष झाले असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. दुसरा प्रश्न म्हणजे प्रशासनाच्या देखरेखीचा. जर एखादी शाळा आवश्यक मान्यतेशिवाय चालत असेल किंवा इमारत नियमबाह्य असेल, तर ती अनेक वर्षे संबंधित विभागांच्या निदर्शनास का आली नाही? एखादा वाद निर्माण झाल्यानंतरच प्रशासन जागे होणे ही चांगल्या प्रशासनाची लक्षणे नाहीत. शिक्षण विभाग, महसूल विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी नियमित तपासणीची प्रभावी यंत्रणा उभी करणे तितकेच महत्त्वाचे आहे.  तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कायद्याचे राज्य. कोणत्याही व्यक्तीने किंवा राजकीय नेत्याने केलेले आरोप गंभीर असू शकतात; मात्र अंतिम निर्णय पुरावे, चौकशी आणि कायदेशीर प्रक्रियेच्या आधारेच झाला पाहिजे. चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे किंवा निर्दोष घोषित करणे, या दोन्ही भूमिका न्यायाच्या तत्त्वांशी सुसंगत नाहीत. सोशल मीडियाच्या युगात एखादा व्हिडिओ काही मिनिटांत लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे जनमत वेगाने तयार होते; परंतु जनमत आणि न्यायनिवाडा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. प्रशासनाने भावनांच्या दबावाखाली नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत राहून निष्पक्ष कारवाई करणे आवश्यक आहे. या प्रकरणामुळे राज्यातील खासगी शाळांच्या मान्यता, परवानग्या, सुरक्षितता आणि शैक्षणिक गुणवत्तेचे व्यापक ऑडिट करण्याची गरजही अधोरेखित झाली आहे. केवळ एका शाळेपुरती कारवाई करून हा विषय संपणार नाही. राज्यभरातील सर्व शैक्षणिक संस्थांबाबत एकसमान निकष आणि नियमित तपासणीची व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परतूर प्रकरणाचा शेवट केवळ एका एफआयआरमध्ये किंवा एका शाळेवरील कारवाईत होऊ नये. या घटनेतून शासन, प्रशासन आणि शैक्षणिक संस्था यांनी आवश्यक धडे घेतले, तर भविष्यात अशा वादग्रस्त घटना टाळता येतील. अखेरीस, कोणत्याही लोकशाहीत भावनांपेक्षा कायदा, आरोपांपेक्षा पुरावे आणि राजकारणापेक्षा विद्यार्थ्यांचे हित हेच सर्वोच्च असले पाहिजे.

दैनिक युवा आदर्श दिनांक ०५-०७-२०२६

### टीसी हरवली आहे

एजाज मसूद शेख यांची अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांनी दिलेली इयत्ता १२ वीचे मूळ टीसी दिनांक ०५/०६/२०२६ रोजी शनी मंदिर ते मोती बाग, जालना प्रवासादरम्यान हरवली आहे. सदर टीसी कोणास मिळाल्यास कृपया  मो. ९९२००९९८२६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## रवी खरात यांची निवड, सत्कार




**टेंभुर्णी -प्रतिनिधी**

टेंभुर्णी येथील तरुण शेतकरी रवी साहेबराव खरात यांची जिल्हा स्तरीय पीक स्पर्धेत निवड झाल्याबद्दल त्यांचे सत्कार करण्यात आले. महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन निमित्त सण २०२५ च्या खरीप हंगामातील जिल्हास्तरीय पीक स्पर्धेमध्ये विजेते म्हणून निवड झाली या मुळे त्यांनी सत्कार स्वीकारला.या वेळी उपस्थित मान्यवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कापसे साहेब, कृषी विकास अधिकारी जि.प.जालना, प्रकल्प संचालक (आत्मा) जालना, व जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते.

# नंदुरबार जिल्ह्यातील अती दुर्गम क्षेत्राच्या आदिवासी भागातील पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था!



देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालेत तरीही देशातील अनेक राज्यात किंवा जिल्ह्यात पायाभूत व मुलभूत सुविधांचा मोठा प्रमाणात अभाव दिसून येतो.याचे जिवंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्यातील समस्या. राज्याचा विकास जेवढ्या झपाट्याने सुरू असल्याचे सांगितले जाते. त्यापेक्षा जास्त खस्ता परिस्थिती राज्यातील अती दुर्गम भागातील पायाभूत व मुलभूत सुविधांच्या अभावामुळे दिसून येते.अशीच घटना नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील टाकळी गावाजवळ निझरी नदीवरील पूल अद्याप अपूर्ण असल्याने एका गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी बांबूच्या झोळीतून नदीपात्र ओलांडत जीवघेणा प्रवास करावा लागला.मात्र सुदैवाने महिलेला कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही.आरोग्य आणि दळणवळण यंत्रणेच्या अभावामुळे आजही अती दुर्गम भागातील रूग्णांना बांबूच्या झोळीत न्यावे लागत असल्याची स्थिती कायम आहे ही राज्यासाठी शोकांतिका म्हणावी लागेल.टाकळी नजीकच्या निझरा नदीवरील पुलाचे काम रखडल्याने एका गर्भवती महिलेला झोळीतून रूग्णालयात न्यावे लागले.वेळेत ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याने महिलेने कन्येला जन्म दिला माय-लेक सुखरूप असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.ही गोष्ट ठीक आहे की, गावकऱ्यांनी वेळीच काळजी घेतली अन्यथा, थोडासाही विलंब झाला असता तर अनर्थ झाला असता.परंतु गावकऱ्यांनी थोडासाही विलंब न करता तातडीने बांबूच्या झोळीच्या माध्यमातून दुर अंतरापर्यंत असलेल्या रूग्णालयात न्यावे लागले व महिलेचा व नवजात शिशूचा जीव वाचविला.परंतु थोडासाही वेळ झाला असता तर महिलेच्या जीवाला धोका निर्माण झाला असता.अशीच गंभीर परिस्थिती राज्यासह देशाच्या अनेक अती दुर्गम भागात पहायला मिळते.यावरून स्पष्ट होते राज्याचा विकास हा फक्त शहरापर्यंतच सिमीत असल्याचे दिसून येते.कारण आजही राज्यातील अती दुर्गम भागातील हालत अत्यंत खस्ता ,गंभीर व चिंताजनक आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.काही गोष्टी सरकारच्या लक्षात असून सुद्धा लक्ष देत ही शोकांतिका म्हणावी लागेल.अती दुर्गम भागातील आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) यांना त्या जिल्ह्यातील गंभीर समस्या कशा काय दिसत नाही? याचे आश्चर्यच वाटते!कारण अती दुर्गम भागातील लोकांच्या समस्या डोळ्यासमोर असुन सुद्धा डोळेझाकपणा करतात ही बाब तेथील लोकप्रतिनिधींची शोकांतिका म्हणावी लागेल.गेल्या अनेक वर्षांपासून सरकारचे नंदुरबार जिल्ह्याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.

कारण या अगोदरही अशाप्रकारच्या अनेक भयावह गंभीर घटना घडल्या आहेत.सध्याच्या घटनेमुळे नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील पायाभूत आणि मुलभूत सुविधांची दयनीय अवस्था पुन्हा समोर आली आहे.कारण पूल आणि रस्त्यांची कामे रखडल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची वस्तुस्थिती या घटनेतून अधोरेखित झाली आहे.



नंदुरबारच्या तळोदा तालुक्यातील टाकळी गावातील ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी महिलेला बांबूच्या झोळीतून नदीपात्र ओलांडत दुसऱ्या बाजूला आणले.त्यानंतरही रस्ता अत्यंत खराब आणि ओबडधोबड असल्याने खाजगी वाहनाच्या सहाय्याने महिलेला रूग्णवाहिका उभी असलेल्या ठिकाणी पोहचविण्यात आले व तेथून महिलेला तातडीने तळोदा रूग्णालयात दाखल करण्यात आले आणि महिलेची सुखरूप प्रसूती झाली असून तिने एका कन्येला जन्म दिला.अशाप्रकारे राज्यातील आरोग्य सुविधा रखडलेली दिसून येते.त्यामुळे वरील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता सरकारने अती दुर्गम भागात तातडीने आरोग्य सुविधा प्रदान करावी. जेणेकरून ग्रामस्थांना आरोग्य सुविधा ताबडतोब उपलब्ध होईल.

सध्याच्या परिस्थितीत पावसाळा सुरू आहे अशा परिस्थितीत सुरूवातीच्या पावसातच महाराष्ट्रातील मुंबई, अती दुर्गम भाग व विदर्भासह अनेक भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते ही अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती आहे यावर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे राज्यातील ज्या-ज्या भागात पायाभूत सुविधा व मुलभूत सुविधांचा अभाव आहे अशा सर्वच ठिकाणी सरकारने, लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## भाजपा जालना शहराच्या वतीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन, वृक्षारोपण व जिल्हा कार्यकर्ता संमेलनाचे आयोजन

### मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ तथा अखंड भारताचे पुरस्कर्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी, जालना शहराच्या वतीने सोमवार, दि. ०६ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान (फुलंब्रीकर नाट्यगृह जवळ), जालना येथे प्रतिमा पूजन, वृक्षारोपण तसेच जिल्हा कार्यकर्ता संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असून वृक्षारोपण करण्यात येणार आहे. तसेच आगामी संघटनात्मक उपक्रम, विविध कार्यक्रमांचे नियोजन आणि कार्यकर्त्यांशी संवाद या अनुषंगाने जिल्हा कार्यकर्ता संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

झाडे लावा
झाडे
जगवा

# कुंभारी येथे गावठी कट्ट्यातून फायरिंग; दोन तरुण ताब्यात, तीन जण झाले पसार

केदारखेडा (प्रतिनिधी) : गाडीला कट मारण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून गावठी कट्ट्यातून फायरिंग झाल्याची धक्कादायक घटना ३ जुलै रोजी कुंभारी (ता. भोकरदन) येथे घडली. याप्रकरणी भोकरदन पोलिसांनी हसनाबाद येथील दोन तरुणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून एक गावठी कट्टा व दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. घटनेचा सविस्तर तपशीलः कुंभारी-भोकरदन रस्त्यावर शुक्रवारी दुपारी पाच ते सहा तरुण मोटारसायकलवरून येत होते. हे तरुण मुख्य रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनांना कट मारून हुल्लडबाजी करत होते. तसेच त्यांनी गावातील काही नागरिकांशी अरेरावी व दमदाटी केल्याचेही सांगण्यात आले. त्यानंतर गावातील काही तरुणांनी त्यांना रस्त्यात अडवून जाब विचारला असता वाद वाढला आणि दोन्ही गटांत मारहाण झाली. त्यानंतर संबंधित तरुण तेथून निघून गेले. मात्र, काही वेळाने पुन्हा पाच ते सहा तरुण चाकू व गावठी कट्टा घेऊन गावात परत आले आणि संबंधित तरुणांना धमकावू लागले. काही वेळात ही घटना गावात पसरली आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ जमा झाले. ग्रामस्थांनी दाखवले धाडसः ग्रामस्थांचा जमाव पाहून त्या तरुणांनी गावकऱ्यांना धाक दाखवण्यासाठी कट्ट्यातून फायरिंग केल्याची माहिती आहे. त्यानंतर ग्रामस्थांनी दगडफेक करून त्यांना हुसकावण्याचा प्रयत्न केला. या गोंधळात तीन तरुण मोटारसायकलवरून पळून गेले, तर दोन तरुण गावाच्या दिशेने पळत असताना ग्रामस्थांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडले. या पकडलेल्या दोन्ही तरुणांना ग्रामस्थांनी चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. एक कट्टा व दोन मोटारसायकली जप्तः यादरम्यान एका तरुणाचा सहकारी पळून जाण्यात यशस्वी झाला. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन ताब्यात घेतलेल्या दोन्ही तरुणांकडून एक गावठी कट्टा व दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. याप्रकरणी राजकुमार कांतीलाल भोसले (वय २५) व पृथ्वीराज संतोष चव्हाण (वय २४, रा. वजीरखेडा ह.मु. हसनाबाद) यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर व पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांनी सांगितले.

पान १ व ४ वरुन...

### समृद्धी महामार्ग...

व परतूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिरिक्त मुरूम उत्खनन झाल्याचा दावा केला आहे.

मंठा तालुक्यात १६ अल्पमुदतीच्या परवान्यांद्वारे ८१ हजार ८७५ ब्रास मुरूम उत्खननास परवानगी देण्यात आली होती. त्यापैकी नऊ प्रकरणांच्या  मोजणीत मंजूर प्रमाणापेक्षा अधिक उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच दहिफळ भोंगाणे येथील नागथास प्रकल्पातून विनापरवाना उत्खनन झाल्याचाही आरोप करण्यात आला असून, या दोन्ही बाबी मिळून ८२ हजार ५८९.४७ ब्रास अतिरिक्त उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

परतूर तालुक्यात २५ अल्पमुदतीच्या परवान्यांद्वारे २ लाख १७ हजार ४८० ब्रास मुरूम उत्खननास मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी २२ प्रकरणांच्या  मोजणीत मंजूर प्रमाणापेक्षा अधिक उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला असून, हेलसवाडी येथील पाझर तलाव क्रमांक १ मधून परवाना आदेशाशिवाय उत्खनन झाल्याचाही आरोप आहे. या दोन्ही बाबी मिळून २ लाख ६ हजार ८३२ ब्रास अतिरिक्त उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

**विधानसभेत १० लाख ब्रास अवैध उत्खननाचा दावा**

महाराष्ट्र विधानसभेत हा विषय उपस्थित करताना आमदार बबनराव लोणीकर यांनी सुमारे ७६ हजार ब्रास मुरूमाची रॉयल्टी भरून प्रत्यक्षात जवळपास १० लाख ब्रास मुरूमाचे उत्खनन करण्यात आल्याचा गंभीर आरोप केला. या प्रकारामुळे शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करत संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

**महसूल मंत्र्यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक**

या प्रकरणाची गंभीर दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या दालनात उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला जालना जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, संबंधित विभागाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून, उपलब्ध अहवाल, महसुली नुकसान, उत्खननाची वस्तुस्थिती आणि गुणवत्तेबाबतच्या तक्रारींचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती आहे.

**निष्पक्ष चौकशी व कठोर कारवाईची मागणी**

आमदार लोणीकर यांनी या संपूर्ण प्रकरणात तांत्रिक, प्रशासकीय आणि आर्थिक अशा तिन्ही स्तरांवर स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. मंजूर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन, रॉयल्टीची चोरी, शासनाच्या महसुलाची हानी किंवा संबंधित अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा सिद्ध झाल्यास कंत्राटदार कंपनी तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय, आर्थिक आणि फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी त्यांची भूमिका आहे.

दरम्यान, हजारो कोटी रुपयांच्या सार्वजनिक निधीतून उभारल्या जात असलेल्या समृद्धी महामार्गाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, शासनाच्या महसुलाचे संरक्षण व्हावे आणि संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. परतूर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यामुळे या प्रकरणातील पुढील तपास, उच्चस्तरीय बैठकीतील निर्णय आणि चौकशीचा अहवाल याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### जालना जिल्ह्यात...

सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

संत मुक्ताबाई पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित होत असलेला हा ऐतिहासिक रिंगण सोहळा वारकरी परंपरेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल. या भक्तिमय, सांस्कृतिक व ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी जालना जिल्ह्यातील तसेच परिसरातील सर्व वारकरी, भाविक, नागरिक आणि युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अभूतपुर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

### टेंभुर्णी बसस्थानकाला...

करण्यासाठी किंवा

कारवाई करण्यासाठी फिरकत नाहीत. डोळ्यांसमोर सरकारी जागेवर अतिक्रमण होत असताना अधिकाऱ्यांनी बघ्याची भूमिका घेतल्याने त्यांचा अतिक्रमणधारकांशी काही अर्थपूर्ण संबंध आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

वाहतूक कोंडीमुळे एसटी बसला वळण घेताना रस्त्यावरील गर्दीत एखादा मोठा अपघात झाल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे. येथील सर्व अनधिकृत अतिक्रमणे तातडीने हटवून रस्ता मोकळा करावा.  जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

### विधानसभेत शेतकरी...

दोन बालकांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिडको प्रकल्पाच्या कामाला गती द्यावी तसेच जिल्ह्यातील वीज प्रश्न तातडीने सोडवावा, अशा विविध लोकहिताच्या प्रश्नांवर आमदार खोतकर यांनी विधानसभेत ठामपणे आवाज उठवला. सत्कार प्रसंगी सरपंच बाळू पाचरणे, चेअरमन पांडुरंग तिडके, सरपंच मल्हारी पठाडे, तालुका प्रमुख भगवान आंबोरे, शेख फकीरा, शाहू खंदारे, निवृत्ती साबळे, रमेश वाघ, कडूबा इंदलकर, पोलीस पाटील मगर, महादू वाघ यांच्यासह

पानशेंद्रा, धावेडी, गोंदेगाव, वंजार उमरद आदी गावांतील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### मसाला जाहिरात...

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ‘‘सेलिब्रिटींनी कोणत्याही जाहिरात करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी त्याची कायदेशीर तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः, पॅन मसाला किंवा आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या उत्पादनांच्या जाहिराती करताना अधिक जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. जर स्वाक्षरी बनावट असल्याचे सिद्ध झाले, तर संबंधित जाहिरात एजन्सी किंवा ब्रँडवर फसवणुकीचा गुन्हा दाखल होऊ शकतो. यामुळे सेलिब्रिटींच्या प्रतिमेलाही धक्का लागू शकतो.

# बालभारतीच्या पुस्तकात लोककला हरवली..?

...शालेय पाठ्यपुस्तके ही केवळ अक्षरांची ओळख करून कादीर,देणारी माध्यमं नसतात, तर ती विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि परंपरांची पाळेमुळे रुजवणारी महत्त्वाची साधनं असतात. नुकताच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) इयत्ता ६ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. लोकनृत्य या शीर्षकाच्या असलेल्या धड्यात महाराष्ट्रातील अत्यंत समृद्ध आणि जगप्रसिद्ध लोकपरंपरांना डावलून इतर राज्यांतील लोकनृत्यांना झुकते माप दिल्याचा आरोप होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक नामवंत अभ्यासक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी बालभारतीच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवला असून हा वाद आता चांगलाच पेटला आहे. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना संस्कृती, परंपरा शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तकात जो धडा समाविष्ट केला जाईल, तेव्हा त्यात महाराष्ट्राच्या मातीतील कलाप्रकारांना प्राधान्य मिळेल अशी साहजिकच अपेक्षा असते. मात्र, बालभारतीच्या पुस्तकात अगदी या विपरीत घडले आहे. लोकनृत्य शीर्षकाच्या या धड्यात एकूण ५ लोकनृत्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील केवळ वारकरी दिंडी हे एकमेव लोकनृत्य घेण्यात आले आहे. तर उर्वरित ४ लोकनृत्ये ही भारताच्या इतर वेगवेगळ्या राज्यांतील आहेत. यामध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडच्या बस्तर भागातील लोकनृत्याचा समावेश करण्यात आला



आहे. खरे तर या धड्यातून महाराष्ट्रातील मराठी मनाला आणि संस्कृतीला साद घालणारी लावणी, लेझीम, कोळी नृत्य, जागरण-गोंधळ, पोवाडा, धनगर समाजाचे ढोलाच्या तालावरील पारंपरिक नृत्य यांसारख्या कलाप्रकारांची ओळख करून द्यायला हवी होती. परंतु त्याऐवजी परराज्यातील नृत्यांना सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत आहे. यावर अभ्यासकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि अत्यंत वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेली भूमी आहे. प्रत्येक मैलानुसार बदलणाऱ्या भौगोलिक स्थानाला स्वतःची अशी एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेत लोककला आणि लोकनृत्यांना महत्त्वाचे स्थान आहे. असे असूनही या धड्यात महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला डावलण्यात आले आहे. जर सहावीच्या विद्यार्थ्यांना लोकनृत्यांची ओळख करून द्यायचीच होती, तर आधी आपल्या राज्यातील वैविध्यपूर्ण लोककलांची ओळख सविस्तरपणे करून देणे गरजेचे होते. तसे न करता आपल्या घरची श्रीमंती बाजूला ठेवून शेजाऱ्यांच्या वैभवाचे गुणगान गाण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्रातील मुलांना आधी स्वतःच्या राज्याची संस्कृती, मातीचा गंध आणि या मातीतून जन्माला आलेल्या लोककला समजायला हव्यात.

परराज्यातील संस्कृतीचा आदर नक्कीच असावा, पण तो स्वतःच्या संस्कृतीला डावलून किंवा तिची उपेक्षा करून नसावा. सर्वात खेदाची बाब म्हणजे, या धड्यावरून एवढा मोठा वाद निर्माण झालेला असतानाही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांनी अद्याप यावर कोणताही अधिकृत खुलासा केलेला नाही. या मौनामुळे शिक्षण वर्तुळात संताप आणखी वाढला असून, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. बालभारतीचा अभ्यासक्रम तयार करताना देशातील विविधतेची ओळख करून देणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा हेतू असू शकतो. पंजाब, गुजरात, बिहार आणि छत्तीसगडच्या लोकनृत्यांचा समावेश करण्यामागे भारतीय संस्कृतीची बहुविधता विद्यार्थ्यांना कळावी हा यामागे विचार चार असू शकतो. परंतु, राष्ट्रीय एकात्मतेचा पाठ देताना प्रादेशिक अस्मिता आणि स्थानिक वारसा दुय्यम ठरवला जाऊ शकत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर मुलांना आधी स्वतःच्या परिघातील संस्कृतीशी जोडणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्या अधिक योग्य असते. महाराष्ट्रात राहणाऱ्या विद्यार्थ्याला लेझीम, पोवाडे किंवा गोंधळ यामागचा इतिहास, या लोककलांच्या सादरीकरणाची पद्धत माहीत नसताना, त्याने थेट छत्तीसगडच्या बस्तर नृत्याचा अभ्यास करावा, हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांचा वैचारिक गोंधळ नाही तर दुसरे काय? हा वाद आता केवळ साहित्यिक वर्तुळापुरता मर्यादित राहिलेला नसून, सामाजिक माध्यमे आणि राजकीय स्तरावरही या धड्यावर चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणावर आणि शिक्षण पद्धतीवर नेहमीच जागरूक असणाऱ्या या राज्यात, थेट बालभारतीच्या पुस्तकावर आक्षेप घेतल्याने शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

बालभारतीची पुस्तके अत्यंत जबाबदारीने आणि तज्ज्ञांच्या समितीकडून तयार केली जातात. अशा वेळी महाराष्ट्रातील एवढ्या मोठ्या लोकपरंपरेची उपेक्षा होणे ही नक्कीच या तज्ज्ञांना विचार करायला लावणारी गोष्ट आहे. विविधतेत एकता साजरी करताना आपल्या स्वतःच्या समृद्ध मुळांना विसरून चालणार नाही. या वादाच्या निमित्ताने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेतील त्रुटींवर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे. आता शासन यावर काय पाऊल उचलते आणि बालभारती आपली चूक सुधारून महाराष्ट्राच्या लावणी, लेझीम, पोवाड्याला पुस्तकात त्यांचे हक्काचे मानाचे स्थान परत देते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. आधीच इंग्रजी माध्यमात शिकणारी पिढी प्रचंड सांस्कृतिक, भाषिक घुसळणीतून जात आहे. अशा स्थितीत महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना इथल्या मातीतल्या लोककला,परंपरांचे धडे कसे काय मिळतील याला प्राधान्य देणे खूपच गरजेचे आहे. त्यासाठी आधी बालभारतीच्या तज्ज्ञांनी स्वतःच्या मनातला सांस्कृतिक गोंधळ दूर करायला हवा.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.**

# देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे.

या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंध्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास्□ दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# विविध मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाची जिल्हा परिषदेसमोर निदर्शने

**दत्ता देशमुख**

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने गुरूवारी जालना जिल्हा परिषदेसमोर निदर्शने करण्यात आली.

मराठवाडा शिक्षक संघाचे जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे,सचिव संजय येळवंते डॉ. मारोती तेगमपुरे, ज्ञानोबा वरवट्टे आदींच्या नेतृत्वाखालील ही निदर्शने करण्यात आली. निदर्शनांनंतर जालना जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) बाळासाहेब खरात यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन

योजना लागू करावी. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतरतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी, राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार १००% शिक्षकांची अनुदान देऊन वेठबिगारी संपवावी, ४०%, ६०%,८०% १००% टप्पा वाढीचे आदेश लवकरात लवकर निर्गमित करावेत, आरटीई कायद्याची अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी सक्ती रद्द करा तसेच पदोन्नतीसाठी टीईटीची अट रद्द करा, शिक्षकांची बीएलओ कामातून मुक्तता करावी त्याप्रमाणे मतदार याद्यांच्या पुर्नानिरीक्षण (एसआयआर) साठी सहायक करण्यात आलेल्या शिक्षकांच्या नियुया रद्द कराव्यात आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. या निदर्शनात शेषराव गोरे, एफ. एस. सय्यद, आर. बी. भुसारे, एस. बी. दुबे, बाळासाहेब सावंत, बी. ए. बागल, पी. जी. ढाकणे, ए. एच. शेजूळ, जे.एम. वैष्णव, एम. एच. चव्हाण, व्ही, बी. इफ्पर, आर.एन. गाढे यांच्यासह शिक्षक मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

# सेवलीलाच अपर तहसील कार्यालय द्यावे; अन्यथा ८ जुलैपासून बेमुदत आमरण उपोषण



**सिंधीकाळेगाव -प्रतिनिधी**

जालना तालुक्यात प्रस्तावित अपर तहसील कार्यालयाची स्थापना सेवली येथेच करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार सेवली हे गाव सर्व बाबींमध्ये पात्र असूनही काही अधिकाऱ्यांकडून अन्य गावाचा प्रस्ताव पुढे पाठविण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या निकषांचा योग्य विचार न करता प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. सेवली गावाची भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, प्रशासकीय सुविधा आणि नागरिकांची सोय लक्षात घेता अपर तहसील कार्यालयासाठी सेवली हाच योग्य पर्याय असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास ८ जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून सेवली येथील बसस्थानक परिसरात बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. ही माहिती सोनदेवचे माजी सरपंच गजानन ढाकणे यांनी दिली.या निवेदनावर ढाकणे.सतीश डुमे, सोनदेवचे माजी सरपंच गजानन ढाकणे.दत्ता बवडे, परमेश्वर गाडीकर, प्रल्हाद पालवे आणि गणेश मोरे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून, शासनाने सेवलीच्या मागणीचा सकारात्मक विचार करून अपर तहसील कार्यालयाची स्थापना सेवली येथेच करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

# जालन्याच्या विविध प्रश्नांवर विधानसभेत आक्रमक भूमिका; खरपुडी नवनगर सिडकोसह जनहिताच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या आ.अर्जुनराव खोतकरांचा नागरिकांकडून जाहीर सत्कार

## खरपुडी नवनगर सिडको प्रकल्प, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुबार पेरणी, वीजपुरवठा, ठेवीदारांची फसवणूक, भटक्या कुत्र्यांचा उपद्रव आणि बाल गुन्हेगारीचे प्रश्न विधानसभेत प्रभावीपणे मांडल्याची दखल

**जालना । प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनात जालना विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्याशी संबंधित विविध जनहिताचे प्रश्न आक्रमकपणे आणि प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधणारे शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांचा जालना शहरातील विविध सामाजिक संघटना, शेतकरी, शिवसेना पदाधिकारी आणि नागरिकांच्या वतीने शनिवारी दर्शना बंगल्यावर शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित नागरिकांनी जालना जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेत सातत्याने आवाज उठविल्याबद्दल आमदार खोतकर यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच पद्धतीने जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सत्कारानंतर बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, जालना शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा खरपुडी नवनगर सिडको प्रकल्प अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडलेला आहे. या प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनींचा मोबदला अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे विधानसभेत हा विषय ठामपणे मांडून प्रकल्पासाठी संपादित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने प्रलंबित मोबदला अदा करण्यात यावा, उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करावे आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करावी, अशी आग्रही मागणी शासनाकडे करण्यात आली.



यासंदर्भात शासनाने संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिल्याचे सांगत, अधिवेशन संपल्यानंतर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींसह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सिडको प्रकल्पाला गती देण्यासाठी सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. याशिवाय, यंदाच्या अनियमित पावसामुळे जालना जिल्ह्यात अनेक भागांत शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी विधानसभेत केली. कृषी क्षेत्राला सावरण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

जिल्ह्यातील अनेक नागरिकांची क्रिप्टो करन्सी, जेडीसीसी कॉईन तसेच काही नागरी सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहारांमुळे फसवणूक झाल्याचा मुद्दाही त्यांनी सभागृहात उपस्थित केला. ठेवीदारांचे पैसे सुरक्षित राहावेत, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि फसवणूकग्रस्तांना न्याय मिळावा, यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

जालना शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे नमूद करत या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक निधी व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

राज्यात वाढत्या बाल गुन्हेगारीच्या घटनांबाबतही त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. बालकांना गुन्हेगारीच्या प्रवाहापासून दूर ठेवण्यासाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, समुपदेशन, पालक जनजागृती आणि सामाजिक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज असल्याचे त्यांनी सभागृहात मांडले. जालना शहर आणि परिसरात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि उद्योगधंद्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगत त्यांनी विधानसभेत हा प्रश्नही जोरकसपणे उपस्थित केला.

महावितरणने शहरासह ग्रामीण भागात अखंडित, दर्जेदार आणि सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश शासनाने द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार खोतकर म्हणाले की, जालना जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्न शासनापर्यंत पोहोचविणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे. जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्याची भूमिका भविष्यातही कायम राहील. विकासकामे, शेतकऱ्यांचे प्रश्न, पायाभूत सुविधा, उद्योग, शिक्षण आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी आपण सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करत राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख पंडितराव भुतेकर, जालना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचफुले, वसंतराजे जाधव, भरतदादा शेजुळ, प्रमेश्वर (तात्या) शिंदे, आण्णा गायकवाड, रोहित शेजुळ, जालूभाऊ वायळ, अप्पासाहेब भोसले, भगवान भोसले, समाधान शेजुळ, किशोर शिंदे, सतीश शेजुळ, कांता टोपे, संतोष हरकत यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा विधानसभेत उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांमुळे जालना जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. विशेषतः खरपुडी नवनगर सिडको प्रकल्प, शेतकऱ्यांचे प्रश्न, ठेवीदारांचे हित, वीजपुरवठा आणि शहरातील नागरी समस्यांबाबत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे उपस्थितांनी स्वागत करत भविष्यातही हा पाठपुरावा अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली.





श्री संत मुक्ताबाई च्या पालखीचे आज टाळ मृदुंग व राम कृष्ण हरी जय हरी विठ्ठल च्या घोषात जालना जिल्ह्यात आगमन झाले या दिंडीमध्ये चार हजार वारकरी महिला व पुरुष यांचा सहभाग असून मुक्ताईनगर येथून निघालेली पालखी पायी चालत आज कन्हैयानगर जालना येथे मुक्काम करून उद्या पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल छायाचित्र अनिल व्यवहारे



उद्या होणाऱ्या संत श्री मुक्ताबाई पालखी सोहळ्याच्या रिंगण करिता जे.ई.एस महाविद्यालय येथे आज रिंगण सोहळ्याच्या तयारीची पाहणी करताना मुक्ताई नगर संस्थाचे अध्यक्ष ह भ प रवींद्र पाटील महाराज, पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह भ प रविंद्र हरणे महाराज, रिंगण सोहळ्याचे अध्यक्ष ह भ प ज्ञानेश्वर महाराज मुळे, आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा परिषद मुख्याधिकारी डॉ कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिकेच्या विद्युत उप अभियंता सौ कोमल गावंडे, विजय फुलंब्रीकर, श्री सउद, महिला व बालकल्याण सभापती सौ संध्या देठे, पोलीस उपाधीक्षक अनंत कुलकर्णी, सदर बाजार चे पोलीस निरीक्षक संदीप भारती, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, जगदीश भारतीया, सौ वंदना साळवे, संतोष वरकड, बापू साळवे, दत्ता घुले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. ***छायाचित्र अनिल व्यवहारे***

## विधानसभेत शेतकरी, कष्टकरी व जालना शहरातील विविध प्रश्न मांडल्याबद्दल आ. अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार

**जालना – प्रतिनिधी**
विधानसभा अधिवेशनादरम्यान माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहरासह जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी
आणि सर्वसामान्य नागरिकांचे विविध प्रश्न अत्यंत तळमळीने विधानसभेत मांडल्याबद्दल गोंदेगाव व पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने त्यांचा शिवसेना संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव भुतेकर,



जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव खरात, विभाग प्रमुख प्रभाकर घडलिंग यांच्यासह वाघ्रूळ, धावेडी, गोंदेगाव आणि वंजार उमरद येथील पदाधिकारी उपस्थित होते. जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध होत नसून त्यासाठी अनेक अडचणी आणि जाचक अटींचा सामना करावा लागत असल्याचे शिवसेना संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनी आमदार खोतकर यांच्या निदर्शनास आणून दिले होते. त्याची दखल घेत आमदार खोतकर यांनी हा विषय विधानसभेत
उपस्थित केला. तसेच जालना शहरात वाढत असलेले बालगुन्हेगारीचे प्रमाण, तरुण पिढीचे वाढते गुन्हेगारीकरण, बटन गोळी, गुटखा यांसारख्या व्यसनाधीनतेवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी सभागृहात केली. याशिवाय जालना शहरातील मोकाट कुत्र्यांमुळे *(पान २ वर)*

## डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी जालन्यात व्याख्यान

**जालना – प्रतिनिधी**
भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त जालना शहरात दिनांक ६ जुलै रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी विचारमंच तर्फे या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतनिमित्त सोमवार दिनांक ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यानात त्यांना अभिवादन केले जाणार आहे. दुपारी ४ वाजता गुरू गणेश भवन सभागृहात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जीवन चरित्रावर भाजपचे प्रदेश महामंत्री सुनील राणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रा. सुरेश कुलकर्णी हे सुद्धा डॉ. मुखर्जी यांच्या जीवन



कार्यावर प्रकाश टाकणार आहेत. यावेळी आमदार बबनराव लोणीकर हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. अभिवादन व व्याख्यानास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी विचारमंचचे अध्यक्ष विरेंद्रप्रकाश धोका यांनी केले आहे.
नूतन विधानपरिषद सदस्यांचा सत्कार महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेल्या मराठवाड्यातील सदस्यांचा सत्कार सोहळा दिनांक ६ जुलै २०२६ रोजी गुरू गणेश भवनात आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे असणार आहेत. यावेळी आमदार बबनराव लोणीकर, आमदार हिकमत उढाण, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कऱ्हाड, उद्योजक घनश्यामदास गोयल, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महानगर पालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर तसेच
विषय समित्यांचे सभापती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या जालना तालुका सहसचिवपदी गणेश कातकाडे यांची नियुक्ती

**जालना – प्रतिनीधी**
लोकांच्या हितासाठी सदैव तत्पर असणाऱ्या अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या जालना तालुका सहसचिवपदी कडवंची येथील युवा समाजसेवक गणेश कातकाडे यांची नियुक्ती नुकतीच महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी.जे. यांच्या हस्ते करण्यात आलेली आहे, यावेळी महासंघाचे जालना शहर सहसचिव ईम्रान खान यांची विशेष उपस्थिती होती.

समाजातील तळागळातील वंचीत, वृद्ध, युवक, महिला, विद्यार्थी, कामगार या सर्वाच्या हितासाठी सर्वातपरी प्रयत्न करावे असे आवाहन नियुक्ती



पत्रामध्ये करण्यात आलेले आहे. सदर नियुक्ती बद्दल गणेश कातकाडे यांचे महासंघाचे कार्याध्यक्ष वसीम खान, जिल्हाध्यक्ष प्रदिप दिव्यवीर तसेच सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या आहेत.

## मसाला जाहिरात प्रकरण: सलमान खानच्या स्वाक्षरीच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह

**जालना – प्रतिनिधी**
प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता सलमान खान याला एका पॅन मसाला उत्पादनाच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीप्रकरणी राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगा ने सलमान खानविरुद्धच्या कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. या प्रकरणातील मुख्य मुद्दा सलमान खानच्या जाहिरात करारावरील स्वाक्षरीच्या सत्यतेचा आहे.
हे प्रकरण कोटा येथील इंद्र मोहन सिंग हनी यांनी दाखल केलेल्या तक्रारीतून सुरू झाले. हनी यांनी आरोप केला होता की, सलमान खानने एका पॅन मसाला ब्रँडची जाहिरात करून ग्राहकांची दिशाभूल केली आहे. या तक्रारीनंतर, कोटा जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने सलमान खानला नोटीस बजावली होती. सलमान खानने या नोटीसला उत्तर देताना, संबंधित जाहिरात करारावरील स्वाक्षरी आपली नसल्याचे म्हटले होते.
यावर, कोटा जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगा ने सलमान खानला त्याच्या स्वाक्षरीच्या फॉरेन्सिक तपासणीसाठी नमुने सादर करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला सलमान खानने राजस्थान राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगात आव्हान दिले. राजस्थान राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगा चा आदेश कायम ठेवला, ज्यामुळे सलमान खानला मध्ये अपील करावे लागले.
राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगा ने १० जून रोजी दिलेल्या आदेशात, सलमान खानविरुद्धच्या कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. आयोगाने नमूद केले की, स्वाक्षरीच्या सत्यतेचा मुद्दा महत्त्वाचा आहे आणि यावर सखोल विचार करणे आवश्यक आहे. जोपर्यंत स्वाक्षरीच्या सत्यतेबाबत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत कार्यवाही पुढे नेणे योग्य नाही.
या प्रकरणावर भाष्य करताना, नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष . महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हे प्रकरण सेलिब्रिटींनी जाहिराती करताना किती सावधगिरी बाळगावी, याचा एक महत्त्वाचा धडा आहे. अनेकदा सेलिब्रिटी केवळ पैशासाठी कोणत्याही उत्पादनाची जाहिरात करतात, परंतु त्या उत्पादनाची गुणवत्ता किंवा कायदेशीर बाबी तपासत नाहीत. या प्रकरणात, सलमान खानने आपली स्वाक्षरी बनावट असल्याचे म्हटले आहे, ज्यामुळे कराराच्या सत्यतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. *(पान २ वर)*

## डॉ.सुभाषराव ढाकणे शैक्षणिक संकुलात 'मोगरा फुलला' ज्ञानियांचा राजा सोहळा संपन्न

**जालना – प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे शैक्षणिक संकुलात 'मोगरा फुलला' हा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित संगीतमय कार्यक्रम दिनांक ०३ जुलै रोजी संपन्न झाला.
यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध निरूपणकार व व्याख्याते गणेश शिंदे यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनातील प्रेरणादायी, हृदयस्पर्शी आणि समाजप्रबोधन करणारे प्रसंग प्रभावी निरूपणातून श्रोत्यांसमोर उलगडले. त्यांच्या ओघवत्या शैलीला महाराष्ट्रातील नामवंत गायक,वादक आणि संगीतकारांची सुरेल साथ लाभली असून हा कार्यक्रम



श्रवणीय आणि संस्मरणीय ठरला आहे.संत साहित्य आणि संगीत यांचा सुंदर संगम असलेला हा कार्यक्रम सर्व वयोगटातील रसिकांसाठी पर्वणी ठरला असून या निमित्त संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचे आधुनिक संदर्भात दर्शन घडविणारा हा अनोखा सांस्कृतिक सोहळा अनुभवण्याची संधी जालनेकरांना मिळाली.सदरील अध्यात्मिक – सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन माजी नगराध्यक्ष तथा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते भास्करराव आंबेकर, विधिज्ञ डॉ.दीपक कोल्हे, जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के,एचडीएफ़सी बँकेचे व्यवस्थापक श्री.वाडेकर साहेब यांच्या हस्ते झाले.यावेळी डॉ.सुभाषराव ढाकणे बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष डॉ.प्रीती वारे,सचिव श्रीमती शीलाताई खेडकर, उपाध्यक्ष श्री.सुनिल मुंढे, सहसचिव ॲड.गजानन मांटे,डॉ.एकनाथ जईद,प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती तसेच श्रोत्यांनी भरभरून दाद व प्रतिसाद दिला.सर्व प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आध्यात्मिक – सांस्कृतिक सोहळा यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले असून जालना जिल्ह्यातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## शहरातील अनियमित पाणीपुरवठा व नागरिकांच्या मुलभूत समस्या वर तात्काळ कारवाई करा –गणेश नळगे

**परतूर – प्रतिनिधी**
परतूर नगर परिषद चे मुख्याधिकारी यांना दि.०३/०७/२०२६, रोजी गटनेते तथा नगरसेवक यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले आहे. शहरातील नागरिकांना सध्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या नागरी समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शहरातील अनेक भागांमध्ये नियमित वेळेवर व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे नगर परिषदे कडून पाणीपुरवठ्याचे कोणतेही निश्चित वेळापत्रक पाळले जात नसल्याने सर्व सामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून नगर परिषदेच्या प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या



प्रमाणावर अतिक्रमाने झाल्याच्या तक्रारी सातत्याने नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. गाव भागात आठवडी बाजार परिसरातील मंदिरासमोर काही व्यक्तींनी अतिक्रमणाबाबत स्थानिक नागरिकांनी लेखी तक्रारी दिल्या आहेत. याशिवाय शहरातील अनेक ठिकाणी झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा व सार्वजनिक मालमत्तेचा प्रश्न गंभीर झालेला आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. सार्वजनिक रस्ते मोकळ्या जागा व शासकीय मालमत्तेवरील अतिक्रमण हटविणे नगरपरिषदेची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणावर समान निकषानुसार तातडीने कारवाई करण्यात यावी.यामुळे उदभवनाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संपूर्णपणे नगर परिषद प्रशासन जबाबदार राहील. यावेळी गटनेता, गणेश नळगे. मुख्य प्रतोद, बाबूराव हिवाळे.नगर परिषद सदस्य, राजेश खंडेलवाल.शाकेरोद्दीन खातीव. कल्पना डहाळे. स. तहसिन बेगम स.अक्रम.मिरा कदम. माधवी पवार.सरस्वती तेलगड.यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.